**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**क्र.नअ/25692/आसेप्र दि.15.04.2015**

विषय - सहायक अभियंता (स्थापत्य /यां.व वि.) या संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्याबाबत.

संदर्भ - जाहिरात दि.31.03.2015

उपरोक्त संदर्भित विषयान्वये महापालिकेच्या संकेतस्थळावर सहायक अभियंता (स्थापत्य /यां.व वि.) या संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्याबाबतची जाहिरात दि.31.03.2015 रोजी व दि.01.04.2015 रोजी प्रसारीत करण्यात आली होती. दि.02.04.2015 पासून ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रीया आय.बी.पी.एस. या संस्थेमार्फत सुरु करण्यात आली. ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम दि.15.04.2015 पर्यंत आहे. (मध्यरात्री 11.59 वाजेपर्यंत)

दि.15.04.2015 रोजी सायं. 5.26 वाजता आय.बी.पी.एस. या संस्थेमार्फत ई-मेल द्वारे असे कळविण्यात आले की, काही तांत्रिक अडचणीच्या कारणांस्तव उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यास अडचण उद्भवत आहे. ती तांत्रिक अडचण सोडविण्यास त्यांना काही कालावधीची आवश्यकता असल्यामुळे, आय.बी.पी.एस. या संस्थेने अर्ज भरण्याकरीताचा कालावधी 1 ते 2 दिवस वाढवून घ्यावा अशी विनंती महानगरपालिकेस केली आहे.(पृ.क्र. )

उपरोक्त बाब लक्षात घेता, अति. आयुक्त प.उप. यांना मान्य असल्यास सदर ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत 1 दिवस म्हणजेच दि.16.04.2015 च्या मध्यरात्री पर्यंत वाढविण्याकरीता मंजूरीसाठी सविनय सादर.

सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर आय.बी.पी.एस. संस्थेस तसे अवगत करण्यात येईल.

नगर अभियंता

**मा. अति. आयुक्त (प.उप.)**

मान. महोदय,

मा. आयुक्त

मान. महोदय.

15/4/15

A.M.C.(W.S.)

15/4/15

महानगरपालिका आयुक्त

Scanned by CamScanner